# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय

## ४१२, ई शिवाजीनगर पुणे - ४११ ०१६

☏ २५६५६२३४ फॅक्स २५६५६२३४ E-Mail – ropune@dtemaharashtra.gov.in


कालमर्यादा – २०/०१/२०२०

जा.क्र.तंशिविकापु/आस्था-१/बदल्या/२०२०/ 260 दि. 14 JAN 2020

प्रति,
संचालक/ प्राचार्य
अभियांत्रिकी महाविद्यालय,पुणे
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,कराड/अवसरी
शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, कराड

**विषय- सन २०२० - नियमित शासकीय सेवकांच्या नियतकालीक बदल्यांबाबत...**
**१.महाराष्ट्र अभियांत्रिकी शिक्षक सेवा गट अ**
**२.महाराष्ट्र अभियांत्रिकी शिक्षक व प्रशासकीय सेवा गट अ संवर्गातील सर्व साधारण बदल्या सन २०२०**

संदर्भ- संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई यांचे पत्र क्र.४/आस्था/ नियमित अध्यापकांच्या बदल्या/२०२०/३३ दि.१३/०१/२०२०

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने संदर्भिय मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय,मुंबई यांचे पत्राचे अवलोकन करुन आपल्या महाविद्यालयातील शिक्षक व प्रशासकीय सेवा गट अ व गट ब या संवर्गातील अधिकारी यांची माहिती संचालनालयाने दिलेल्या उदाहरणाप्रमाणचे विवरणपत्र अ,ब,क,ड मध्ये Sakal Marathi font – New Microsoft Excel Worksheet मध्ये तयार करुन दिनांक २०/०१/२०२० पुर्वी व्दिप्रतीत या कार्यालयांस सादर करावी. तसेच या माहितीची Softcopy est.ropune@gmail.com व desk4@dtemaharashtra.gov.in या ईमेलवर पाठवावी.

(डॉ.दि.रा.नंदनवार)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत- संगणक विभाग यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

Endorsement

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी -०२२-६८५९७४७१/४२८/४०४ फॅक्स - २६९२१०२.

E-mail : desk४@dtemaharashtra.gov.in Internet :http//www.dtemaharashtra.gov.in


कालमर्यादा
३१-०१-२०२०

क्रमांक : ४/आस्था/नियमित अध्यापकांच्या बदल्या/२०२०/ 33
दिनांक : 13 JAN 2020

प्रति,
१. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद/
अमरावती / नागपूर.
२. सचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्राशिक्षण मंडळ,बांद्रा,मुंबई -४०००५१.

**विषय : नियमित शासकीय सेवकांच्या नियतकालीक बदल्यांबाबत - सन २०२०**

**१) महाराष्ट्र अभियांत्रिकी शिक्षक सेवा गट अ**

**२) महाराष्ट्र अभियांत्रिकी शिक्षक व प्रशासकीय सेवा गट - अ संवर्गातील सर्वसाधारण बदल्या सन २०२०**

संदर्भ : शासकीय कर्मचा-यांचे बदल्यांचे विनियमन करण्यासाठी आणि शासकीय कर्तव्ये पार पांडताना होणा-या विलंबास प्रतिबंध करण्याकरीता सन २००५ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक -२१

शासकीय सेवकांच्या नियतकालिक बदल्याबाबत संदर्भीन अधिनियमान्वये निश्चित केलेल्या धोरणानुसार दिनांक ३१ मे २०२० रोजी एकाच पदावर किंवा एकापेक्षा जास्त पदावर एकाच ठिकाणी ३ वर्ष सेवा पूर्ण करणारे **गट अ मधील पदावर कार्यरत अध्यापक/अधिकारी यांचे** नाव **आद्याक्षरात न लिहिता संपूर्ण नाव** नमूद करून माहिती सोबतच्या विहित प्रपत्र अ, ब, क मध्ये खालील सूचना विचारात घेऊन सादर करावी. प्रशासकीय पदावर कार्यरत गट अ संवर्गातील अधिका-यांची माहिती स्वतंत्र विवरणपत्रात सादर करावी.

१) प्रशासकीय बदलीसाठी संबंधीतांना वैयक्तिक पसंतीची ३ ठिकाणे कळविण्याची सूचना देऊन त्याचप्रमाणे माहिती सादर करण्यांत यावी. मात्र ज्या अधिकारी/अध्यापकांनी बदलीसाठी पसंतीची ठिकाणे दिली नाहीत किंवा तीन पेक्षा कमी ठिकाणे नमूद केलीत त्यांची बदली प्रशासकीय दृष्टीने त्या शिवाय अन्यत्र करण्यांत येईल याची त्यांना जाणीव करून द्यावी.

२) ज्या अध्यापकांनी/अधिका-यांनी विनंती बदलीसाठी अर्ज केले आहेत अशा अध्यापकांची /अधिका-यांची माहिती व त्यांचे विनंती बदली अर्ज सहपत्रासह आपल्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह सादर करण्यांत यावेत. तसेच ज्या अध्यापक/अधिका-यांचे त्यांचे जवळचे नातेवाईकांचे आजारपण व त्यांचे स्वत:चे आजारपणासाठी बदलीची विनंती केली असेल अशा अध्यापक/अधिकारी यांच्या विनंती बदली

अर्जासोबत पर्याप्त वैद्यकीय कागदपत्रे पुरावा म्हणून देणे आवश्यक असून केवळ एका प्रमाणपत्राचे आधारे विनंती बदली विचारात घेतली जाणार नाही. त्याचप्रमाणे विनंती बदलीसाठी अर्ज प्राचार्य / विभागीय कार्यालयामार्फतच सादर करावेत. **संचालनालयास थेट अर्ज सादर करू नये. संचालनालयास थेट अर्ज सादर केल्यास किंवा प्रस्तावाच्या विहित मुदतीनंतर स्वतंत्रपणे प्राप्त झालेला अर्ज विचारात न घेता सदर अर्ज दप्तरी दाखल करण्यांत येतील असे संबंधितांना कळविण्यांत यावे. तसेच दि. ३१-१२-२०१९ पूर्वी सन २०२० मध्ये बदलीकरीता संचालनालयास सादर केलेल्या विनंती अर्जाचा विचार केला जाणार नसल्याची बाब संबंधितांच्या लक्षात आणून द्यावी.**

३) आपल्या अंतर्गत येणा-या शासकीय अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय या संस्थेत कार्यरत असलेल्या अध्यापकांपैकी/अधिका-यांपैकी ज्या अध्यापकांच्या/अधिका-यांच्या बाबतीत विद्यार्थ्यांच्या तक्रारी आहेत अथवा त्यांच्या शैक्षणिक संपादणुक अहवाल प्रतिकुल आहेत अशा अध्यापक/अधिका-यांचे नांवे सुध्दा कळवून त्यांची बदली करणे आवश्यक आहे किंवा कसे ? याबाबत आपले स्पष्ट् मत / अभिप्राय आवश्यक त्या कागदपत्रासहीत (पुराव्यासह) कळविण्यांत यावीत.

४) असे निर्दशनास आले आहे की, संस्थाप्रमुखांनी शिफारशीसह सादर केलेल्या माहितीच्या अनुषंगाने बदल्याबाबत निर्णय घेतल्यानंतर बदली केलेल्या काही अध्यापक/अधिका-यांकडून बदली रद्द करण्याबाबत संस्थाप्रमुखांकडून विनंती करण्यांत येते. म्हणून याबाबत आपणांस सूचित करण्यांत येते की, संदर्भीय बदल्यांच्या कायद्याचे अवलोकन करून बदली पात्र अध्यापक/अधिका-यांच्या बदली करावयाची नसल्यास त्यांचे ठोस समर्थन आवश्यक त्या कागदपत्रासहीत देऊन तशी शिफारस करण्यांत यावी. याबाबत बदल्या झाल्यानंतर आपल्याकडून कोणतीही शिफारस आल्यास विचारात घेतली जाणार नाही.

५) बदलीपात्र अध्यापक/अधिकारी यांचे पाल्य शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये १० वी किंवा १२ वीत शिकत असल्याचे कारणास्तव एक वर्षासाठी बदली न करण्याची शिफारस असल्यास तसे स्पष्टपणे नमूद करून त्याबाबतची कागदपत्रे प्रस्तावासोबत पुराव्याकरीता जोडावीत.

६) जे बदलीपात्र अध्यापक/अधिकारी नजिकच्या कालावधीत डिसेंबर २०२० पूर्वी सेवानिवृत्त होत आहेत अशा अध्यापकांच्या नावांसमोर ठळक अक्षरात अभिप्राय देण्यांत यावा.

७) जे अध्यापक/अधिकारी बदलीसाठी राजकीय दबाव आणतील अशा अध्यापकांवर/अधिका-यांवर प्रचलित शासन नियमानुसार शिस्तभंग विषयक कार्यवाही करण्यांत येईल तसेच सदर बाब वार्षिक गोपनिय अहवालात नमूद करण्यांत येईल ही बाब आपल्या अधिपत्याखालील शासकीय अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र/वास्तुशास्त्र महाविद्यालयातील संस्थेतील प्राचार्य /प्राध्यापक/ सहयोगी प्राध्यापक/सहाय्यक प्राध्यापक यांच्या निदर्शनास आणावी.

८) संदर्भीन अधिनियमात दिलेल्या सर्व तरतूदी व दिनांक २८-०४-२०१५ च्या विभागीय संवर्ग संरचना व विभागीय संवर्ग वाटप नियमावली २०१५ मधील तरतूदी विचारात घेऊन त्या अनुषंगाने बदल्याची माहिती दिल्याचे तसेच सोबतच्या विवरणपत्रातील माहिती अचूक व परिपूर्ण असल्याचे प्रमाणित करावे.

९) जे अध्यापक/अधिकारी इतर आस्थापनेवर प्रतिनियुक्तीने कार्यरत आहेत त्या सर्व अध्यापकांची माहिती मुळ आस्थापनेवरून सादर करावी.

१०) दिनांक २८-०४-२०१५ च्या विभागीय संवर्ग संरचना व विभागीय संवर्ग वाटम नियमावली २०१५ नुसार ज्या अध्यापकांच्या नियुक्त्यांना १ वर्षापेक्षा कमी कालावधी झालेल्या आहे अशा अध्यापकांच्या नावासमोर # चिन्ह दर्शवावे.

आपल्या विभागाअंतर्गत येणा-या शासकीय अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र **महाविद्यालयातील** नियमित नियुक्तीने कार्यरत असलेल्या सर्व अध्यापकांची माहिती सोबतच्या प्रपत्र **क मध्ये विद्याशाखानिहाय व सेवाज्येष्ठतेनुसार** सादर करावी. प्रपत्र अ, ब व क मध्ये दर्शविलेल्या उदाहरणाप्रमाणे **माहिती Sakal Marathi या फॉन्ट** मध्ये New Microsoft Excell worksheet या नमुन्यातील विहित **प्रपत्रात संचालनालयास दिनांक ३१ जानेवारी २०२० पूर्वी** निश्चितपणे पाठविण्याची कार्यवाही **करावी.** तसेच एक प्रत या संचालनालयाच्या desk४@dtemaharashtra.gov.in **या ई-मेल पत्त्यावर सुध्दा पाठविण्यात यावी.**

**( डॉ. अभय वाघ )**
संचालक तंत्रशिक्षण,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत :

१. प्राचार्य, सर्व अभियांत्रिकी महाविद्यालये/तंत्रनिकेतने यांना कळविण्यांत येते की, त्यांच्या संस्थेतील शिक्षकीय/प्रशासकीय गट अ संवर्गातील पदांवर कार्यरत असलेल्या अधिका-यांची माहिती आपल्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह वरील सूचना विचारात घेऊन दि.२०.१.२०२० पर्यंत सोबतच्या विहित प्रपत्रात संबंधित विभागीय कार्यालयास सादर करावी.

२. संचालनालयातील गट अ पदावर कार्यरत अधिकारी.

## प्रपत्र अ

### शिक्षकीय / प्रशासकीय पदावर ३ ( तीन ) वर्षापेक्षा जास्त कालावधी कार्यरत अधिकारी/अध्यापकांच्या प्रशासकीय बदलीसाठीचे विवरणपत्र

### ( प्राचार्य / प्राध्यापक/सहयोगी प्राध्यापक/सहाय्यक प्राध्यापक व प्रशासकीय पदे)

| अ.क्र | शासकीय सेवकाचे नाव (संपूर्ण नांव नमूद करावे) | पदनाम | विद्याशाखा | मूळ वेतन /वेतन पे मॅट्रिक्स/ लेव्हल | जन्मतारीख | सेवानिवृत्तीचा दिनांक | सध्याच्या पदाचा नियमित नियुक्तीचा प्रकार पदोन्नती / नामनिर्देशन | सध्याच्या पदाचा नियमीत नियुक्तीचा दिनांक | सध्या कार्यरत असलेल्या संस्था/आस्थापनेचे नाव | सध्याच्या संस्थेत/आस्थापनेवर कार्यरत असल्याचा दिनांक | अन्यत्र प्रतिनियुक्ती असल्यास त्या संस्थेचे नाव व कालावधी | सध्या कार्यरत असलेल्या संस्थेतील/आस्थापनेतील एकुण सेवा कालावधी ( नक्षलग्रस्त / आदिवासी भागात कार्यरत स्वतंत्रपणे दर्शविण्यात यावा ((दि.३१.०५.२ | प्रशासकीय बदलीसाठी वैयक्तीक पसंतीची तीन ठिकाणे | विनंती बदली असल्यास विनंती बदलीचे ठीकाण | विनंती बदलीसाठीचे तपशिलवार कारण व त्याबाबतची समर्थनिय कागदपत्रे ठिकाण | मान्यवरांची शिफारस | तक्रारींमुळे बदली करणे अथवा अन्य कारणामुळे बदली न करणे इत्यादी अपेक्षित असल्यास त्याबाबतचे सुस्पष्ट अभिप्राय | सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ मधील तरतुदीच या अनुषंगाने संस्था प्रमुख / सहसंचालकांची शिफारस | कार्यरत असलेल्या पदावर यापूर्वी विविध संस्थेतील सेवाकाळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० |
| १ | श्री. अ ब क | सहाय्यक प्राध्यापक | विद्युत अभि | ५७७०० level 10 | ०३-०४-१९८२ | ३०-०४-२०४२ | नामनिर्देशन | ०४-१२-२००७ | शाअम अवसरी | ०१-०८-२०१२ | | ७ वर्ष १० महिने | पुणे कराड औरंगाबाद | पुणे कराड औरंगाबाद | | | | | शाअम औरंगाबाद दि.०४-१२-२००७ ते ३१-०७-२०१० ( ३ वर्षे ८ महिने) शाअम अवसरी दि ०१-०८-१२ ते |

प्रशासकीय पदांची माहिती स्वतंत्र विवरणपत्रात देण्यांत य

**सहसंचालक, विभागीय कार्यालय, यांची स्वाक्षरी व शिक्का**

# प्रपत्र ब

## शिक्षकीय /प्रशासकीय पदावर ३ ( तीन ) वर्षापेक्षा कमी कालावधी कार्यरत अधिकारी/ अध्यापकांच्या विनंती / मान्यवरांच्या शिफारशीसह माहिती

### ( प्राचार्य / प्राध्यापक/सहयोगी प्राध्यापक/सहाय्यक प्राध्यापक व प्रशासकीय पदे)

| अ.क्र | शासकीय सेवकाचे नाव (संपूर्ण नांव नमुद करावे) | पदनाम | विद्याशाखा | मूळ वेतन/वेतन पे मॅट्रिक्स/लेवल | जन्मतारीख | सेवानिवृत्तीचा दिनांक | सध्याच्या पदाचा नियमित नियुक्तीचा प्रकार पदोन्नती / नामनिर्देशन | सध्याच्या पदाचा नियमीत नियुक्तीचा दिनांक | सध्या कार्यरत असलेल्या संस्थेचे नाव | सध्याच्या संस्थेत कार्यरत असल्याचा दिनांक व कालावधी | अन्यत्र प्रतिनियुक्ती असल्यास त्या संस्थेचे नाव व कालावधी | सध्या कार्यरत असलेल्या संस्थेतील एकुण सेवा कालावधी ( नक्षलग्रस्त / आदिवासी भागात कार्यरत स्वतंत्रपणे दर्शविण्यात यावा (दि.३१.०५.२०२० पर्यंत) | विनंती बदली असल्यास विनंती बदलीचे ठीकाण | विनंती बदलीसाठीचे तपशिलवार कारण व त्याबाबतची समर्थनिय कागदपत्रे ठिकाण | मान्यवरांची शिफारस | तक्रारीमुळे बदली करणे अथवा अन्य कारणामुळे बदली न करणे इत्यादी अपेक्षित असल्यास त्याबाबतचे सुस्पष्ट अभिप्राय | सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ मधील तरतुदीचया अनुषंगाने संस्था प्रमुख / सहसंचालकांची शिफारस | कार्यरत असलेल्या पदावर यापूर्वी विविध संस्थेतील सेवाकाळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ |
| १ | श्री. अ ब क | सहय्यक प्राध्यापक | विद्युत अभि | ५७७०० level 10 | ०१-०१-१९८१ | ३१-१२-२०४० | नामनिर्देशन | ३१-१२-२०१० | शाअम कराड | २८-०८-१६ | ---- | ३ वर्ष ९ महिने | पुणे औरंगाबाद नागपूर | वृध्द वडीलांच्या उपचाराकरीता व स्वग्राम असल्या | | | | शाअम कराड दि.३१.१२.२०१० ते २७.०८.२०१६, शाअम जळगाव दि.२८.०८.२०१६ ते आजपर्यत ( २ वर्षे ९ महिने ) |

प्रशासकीय पदांची माहिती स्वतंत्र विवरणपत्रात देण्यांत यावी

# प्रपत्र क

## संस्थेत कार्यरत सर्व अधिकारी/ अध्यापकांची सविस्तर माहिती

| अनु. क्र. | शासकीय सेवकाचे संपूर्ण नाव | पदनाम | विद्याशाखा | मूळ वेतन/वेतनपे मॅटिक्स/लेहल | जन्म तारीख | सेवानिवृत्तीचा दिनांक | सध्याच्या पदाचा नियमित नियुक्तीचा प्रकार नामनिर्देशन / पदोन्नती | सध्याच्या पदाचा नियमित नियुक्तीचा दिनांक | सध्या कार्यरत असलेल्या संस्थेचे नाव | सध्याच्या संस्थेत कार्यरत असल्याचा दिनांक | सध्या कार्यरत असलेल्या संस्थेतील एकूण सेवा कालावधी (नक्षलग्रस्त / आदिवासी भागात कार्यरत स्वतंत्रपणे दर्शविण्यात यावा दि.३१.०५.२०१९पर्यंत) | रकाना क्र. ११ पैकी विनंती वरून अन्यत्र प्रतिनियुक्ती चा कालावधी | प्रशासकीय बदलीसाठी वैयक्तिक पसंतीची तीन (३) ठिकाणे | विनंती बदलसाठी पसंतीची तीन (३) ठिकाणे | विनंती बदलीसाठी तपशीलवार कारण व त्याबाबतची समर्थनिय कागदपत्रे | मान्यवरांची शिफारस | तक्रारीमुळे बदली करणे अथवा अन्य कारणामुळे बदली न करणे इ. अपेक्षित असल्यास त्याबाबतचे सुस्पष्ट अभिप्राय | सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २१ मधील तरतूदींच्या अनुषंगाने संस्थाप्रमुख / सहसंचालकांची शिफारस | कार्यरत असलेल्या विविध पदावर यापूर्वी विविध संस्थेतील संस्था निहाय सेवाकाळ पदनाम / संस्था / कार्यालय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० |
| १ | श्री. अ ब क | सहाय्यक प्राध्यापक | स्थापत्य | ५७७०० level 10 | ०३-०४-१९८२ | ३०-०४-२०४२ | नामनिर्देशन | ०४-१२-२००७ | शा.अभि.महा. अमरावती | ०१-०८-२०१२ | ७ वर्षे १० महिने | ---- | पुणे औरंगाबाद कराड | पुणे औरंगाबाद कराड | | | | | शा.अभि.महा. औरंगाबाद दि.०४-१२-२००७ ते ३१-०७-२०१० (३ वर्षे ८ महिने) शा.अभि.महा.अमरावती दि.०१-०८-१२ ते आजपर्यंत (दि. ६ वर्षे १ महिने) |

सहसंचालक, विभागीय कार्यालय, यांची स्वाक्षरी व शिक्का

माहिती तयार करताना Sakal Marathi या Font चा वापर करावा अन्य कोणत्याही Font मध्ये माहिती पाठवू नये व माहिती Excel मध्ये सादर करावी.

प्रशासकीय पदांची माहिती स्वतंत्र विवरणपत्रात देण्यांत यावी

विभागीय कार्यालयांनी त्यांच्या अधिपत्याखालील संस्थांची माहिती अचूक असल्याची खातरजमा करून एकत्रित प्राचार्य, प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक व प्राध्यापक यांची विद्याशाखानिहाय माहिती सादर करावी.संस्थेकडून आलेली माहिती सादर करू नये.

एका अध्यापकाच्या माहितीसाठी एकच ओळ वापरावी. Multipal Lines मध्ये माहिती देवू नये. (Alt+Enter चा वापर करावा)

अध्यापकांचे संपूर्ण नाव देण्यात यावे

तारीख नमूद करताना DD-MM-YYYY या Format मध्ये नमूद करावी. तारीख नमूद करताना - शिवाय कोणतेही इतर चिन्ह (/, .) वापरू नये

दिनांक ०८-०५-२०१५ च्या संवर्ग विभाजनाच्या शासन अधिसुचनेनुसार ज्या अध्यापकांच्या नियुक्त्यांना १ वर्षापेक्षा कमी कालावधी झालेल्या आहे अशा अध्यापकांच्या नावासमोर # चिन्ह दर्शवावे

अध्यापकांची माहिती दर्शविताना सध्या ते ज्या पदावर कार्यरत आहेत त्या पदावरील रुजू दिनांकापासूनची माहिती प्रपत्र क मधील रकाना क्रमांक २१ मध्ये दर्शवावी

# प्रपत्र - ड

**संस्थेचे नाव :**

| अ.क्र. | पदनाम व विद्याशाखा | मंजूर | भरलेली | रिक्त | कार्यरत अध्यापकाचे संपूर्ण नाव (अद्याक्षरात न लिहिता संपूर्ण नाव नमूद करावे) | कार्यरत अध्यापकांपैकी असाधारण रजा प्रसूती रजा/बालसंगोपन रजा /प्रतिनियुक्तीवर असल्यास त्यांची नावे | शै.व.2019-20 मध्ये सदर विद्याशाखेत प्रवेशित विद्यार्थ्यांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |

प्रशासकीय पदांची माहिती स्वतंत्र विवरणपत्र देण्यांत यावी